# न्यूज एक्सप्रेस मराठी

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# निळ्या पूर रेषेतील जुन्या अधिकृत बांधकामांना वाढीव टीडीआर द्या

## आमदार शंकर जगताप यांनी विधानसभेत उपस्थित केला औचित्याचा मुद्दा: आग्रही मागणी आमदार शंकर जगताप यांनी विधानसभेत केली

**पिंपरी | प्रतिनिधी**

निळ्या पूर रेषेतील बाधित जुन्या अधिकृत बांधकामांना वाढीव टीडीआर देऊन पुनर्विकासाचा मार्ग मोकळा केला जावा, अशी आग्रही मागणी आमदार शंकर जगताप यांनी आज (शनिवारी) विधानसभेत केली.




आमदार जगताप यांनी चिंचवड मतदारसंघातील निळ्या पूर रेषेतील जुन्या अधिकृत बांधकामांबाबत औचित्याचा मुद्दा विधान सभेत उपस्थित केला.

जगताप म्हणाले की, चिंचवड, रावेत वाकड, ताथवडे, पुनावळे, सांगवी, पिंपळे गुरव या पवनानदीच्या पात्रालगत व त्याच बरोबर इंद्रायणी आणि मुळा नदीच्या दाट वस्तीत असलेल्या जुन्या इमारती जीर्ण झाल्या आहेत. त्यामुळे त्या इमारतींमधील पार्किंग व्यवस्था अपुरी पडत आहे.या परिस्थितीमध्ये त्या जुन्या सोसायट्यांचा पुनर्विकास करण्यासाठी महाराष्ट्र एकात्मिक विकास नियंत्रण प्रोत्साहन नियमावली (UDCPR) नुसार प्रस्ताव सादर करण्यात आले होते. तथापि, 30 जानेवारी 2023 च्या सुधारित UDCPR च्या 11.2.8 अन्वये पाटबंधारे विभागाने निळ्या पूर रेषेतील क्षेत्रात हस्तांतरित विकास हक्क (TDR) वापरण्यास परवानगी नाकारली आहे. परिणामी, पूर रेषेतील अधिकृत बांधकामांना अतिरिक्त टीडीआर वापरण्याची परवानगी न मिळाल्याने त्या इमारतींच्या पुनर्विकासाला अडचणी निर्माण झाल्या आहेत.

आमदार जगताप यांनी या मुद्द्यावर विधानसभेत चर्चा करतांना सांगितले की, या निर्णयामुळे रहिवाशांमध्ये अनिश्चिततेचे वातावरण तयार झाले आहे आणि त्यासोबतच पुनर्विकास प्रक्रियाही ठप्प झाली आहे. जवळपास 6 लाख 51 हजार चौरस मीटर क्षेत्राचे पुनर्विकास प्रकल्प रखडले आहेत, त्यामुळे महापालिकेला होणाऱ्या महसुलाचे मोठे नुकसान होत आहे.तसेच, त्यांनी महापालिकेच्या डेव्हलपमेंट चार्जेसच्या माध्यमातून मिळणारा सुमारे 1200 कोटी रुपयांचा महसूल देखील बुडत असल्याचे निदर्शनास आणले.

यावर उपाय म्हणून, त्यांनी विधानसभेत विनंती केली की, निळ्या पूर रेषेतील बाधित जुन्या अधिकृत बांधकामांना वाढीव टीडीआर देऊन पुनर्विकासाचा मार्ग मोकळा केला जावा, त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळेल त्याचबरोबर महापालिकेला आवश्यक महसूल प्राप्त होईल.

# पिंपरी-चिंचवडला 'वॉटर प्लस सिटी' बनवण्यासाठी खासदार श्रीरंग बारणे यांचे केंद्रीय मंत्र्यांना साकडे..!

## पिंपरी-चिंचवडला 'वॉटर प्लस सिटी' बनवण्यासाठी निधी देण्याची मागणी मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी केंद्र सरकारकडे केली.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराच्या चारही बाजूंनी उद्योग, कारखाने आहेत. त्यामुळे लोकसंख्येत झपाट्याने वाढ होत असून पाण्याचा प्रश्न गंभीर होत आहे. तसेच कारखान्यांमधील रसायनमिश्रित पाण्यामुळे इंद्रायणी, पवना नदीच्या प्रदूषणाचा मुद्दा गंभीर झाला आहे. त्यामुळे मोठ्या संख्येने सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) उभारण्याची आवश्यकता आहे. पिंपरी-चिंचवडला 'वॉटर प्लस सिटी' बनवण्यासाठी निधी देण्याची मागणी मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी केंद्र सरकारकडे केली.



खासदार बारणे यांनी केंद्रीय जलशक्ती मंत्री सी.आर. पाटील यांची भेट घेत निधी देण्याची मागणी केली. खासदार बारणे म्हणाले, पिंपरी-चिंचवड शहर पुण्याच्या ईशान्येस आणि मुंबईच्या आग्नेय बाजूस 160 किलोमीटर अंतरावर आहे. उत्तरेकडे चाकण औद्योगिक क्षेत्र म्हणजेच भारतातील ऑटोमोबाईल आणि सहायक उद्योग केंद्र आहे. ईशान्येकडे तळेगाव दाभाडे एमआयडीसी आणि दक्षिणेकडे हिंजवडी आयटी पार्क आहे. शहर लष्करी क्षेत्र आणि छावणीने वेढलेले आहे. ईशान्येला देहू कॅन्टोन्मेंट आहे आणि दक्षिणेला लष्करी क्षेत्राचे दोन मोठी क्षेत्रफळे आहेत. उद्योगांमुळे शहराच्या लोकसंख्येत झपाट्याने वाढ होत आहे. पिंपरी चिंचवड मधील ६० टक्यांपेक्षा जास्त लोकसंख्या वाढ रोजगाराच्या संधीच्या स्थलांतरामुळे झाली आहे. सद्यस्थितीत शहराची लोकसंख्या ३० लाखाच्या घरात गेली आहे.

शहराला पवना धरणातून पाणी पुरवठा केला जातो. सांडपाण्यावरील प्रक्रियेसाठी महापालिकेने ३३३ एमएलडी क्षमतेचे १३ सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारले आहेत. भविष्यातील पाण्याची मागणी पूर्ण करण्यासाठी प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा पुनर्वापर करणे आवश्यक आहे. त्यासाठी महापालिकेने इकोसिस्टम स्थापन करण्याचा प्रस्ताव दिला आहे. या उपक्रमामुळे शहराच्या पाण्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी उपलब्ध पाण्याच्या स्त्रोतांवरील मागणी आणि ताण लक्षणीयरीत्या कमी होईल. जलप्रदूषण कमी करून जलस्त्रोतांचे संरक्षण होईल. प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा पुरवठा खर्चाच्या तुलनेत स्वस्त आहे. महापालिका कॉलेज ऑफ मिलिटरी इंजिनिअरिंगच्या सहकार्याने ४५ एमएलडी क्षमतेचे एसटीपी उभारत आहे.

# मुंबई-पुणे महामार्गावर टोलमाफी करा

## आमदार सुनील शेळके : जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर उड्डाणपूल बांधणी आणि टोल माफी करा

**पिंपरी | प्रतिनिधी**

जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर वाहतूक कोंडी आणि अपघातांची समस्या लक्षात घेता जुन्या महामार्गावर आवश्यक त्या सर्व ठिकाणी उड्डाणपूल बांधावेत आणि संपूर्ण टोल माफी करावी, अशी आग्रही मागणी मावळचे आमदार सुनील शेळके यांनी हिवाळी अधिवेशनात केली.



वार्षिक पुरवणी मागण्यांवर चर्चा करताना आमदार शेळके यांनी महामार्गावरील अपुऱ्या सुविधांवर कठोर शब्दांत भाष्य केले. आमदार सुनील शेळके म्हणाले, रस्ते बांधणीसाठी शेकडो कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असला तरी कामाचा दर्जा समाधानकारक नाही. अधिकारी व ठेकेदार यांच्या संगनमताने कामे निकृष्ट दर्जाची होत आहेत. त्यावर कोणाचाही अंकुश नाही. अनेक रस्त्यांवर जलदगतीने खड्डे पडत आहेत, ज्यामुळे प्रवाशांना अडथळे आणि अपघातांना सामोरे जावे लागत आहे.

आमदार शेळके यांनी सांगितले की, शिळफाटा ते निगडी भक्ती-शक्ती चौक या मार्गावरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी रस्ता रुंदीकरण झाले पाहिजे. तसेच कार्ला फाटा, कान्हे फाटा, वडगाव फाटा, तळेगाव फाटा, सोमाटणे फाटा, देहूरोड सेंट्रल चौक आदी ठिकाणी उड्डाणपूल उभारणे आवश्यक आहे, अशी मागणीही त्यांनी केली.

# ओबीसी फेलोशिपला केंद्राकडून विलंब

## सरकारच्या निर्णयामुळे हजारो विद्यार्थ्यांची आर्थिक कोंडी. यंदा जूनपासून मिळाला नाही निधी

**पुणे | प्रतिनिधी**

नॅशनल फेलोशिप फॉर अदर बॅकवर्ड क्लासेस (एनएफओबीसी) अंतर्गत संशोधन विद्यार्थ्यांना सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाद्वारे त्यांच्या फेलोशिप निधीचे वितरण करण्यात केंद्र सरकारकडून होत असलेल्या विलंबामुळे विद्यार्थी अडचणीत आले आहेत. यामुळे फेलोशिपअभावी हजारो ओबीसी विद्यार्थ्यांची आर्थिक कोंडी होत आहे.

ओबीसी फेलोशिपपासून वंचित विद्यार्थ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांना जून २०२४ पासून त्यांचा निधी मिळाला नाही. तर काही जणांना जानेवारी २०२४ पासून सुरू होणाऱ्या संपूर्ण शैक्षणिक वर्षासाठी निधी मिळालेला नाही. सध्या एकूण २,४९९ विद्यार्थी या योजनेंतर्गत येतात.

ऑल इंडिया रिसर्च स्कॉलर असोसिएशनने (एआयआरएसए) ६ डिसेंबर २०२४ रोजी एका पत्रात सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालयाचे सचिव अमित यादव यांना या समस्येचे निराकरण करण्यासाठी पत्र लिहिले आहे. “आम्ही उपेक्षित समुदायांसाठी उच्च शिक्षणास समर्थन देण्याच्या मंत्रालयाच्या प्रयत्नांची प्रशंसा करतो.

परंतु, विद्यावेतन देय रक्कम (स्टायपेंड पेमेंट) वितरणात दीर्घकाळापर्यंत विलंब झाल्यामुळे आर्थिक स्थिरता, मानसिक कल्याण आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर लक्षणीय परिणाम झाला आहे,” असे पत्रात म्हटले आहे.

नाव न छापण्याच्या अटीवर एका संशोधक विद्यार्थीनी म्हणाली, “जानेवारी २०२३ मध्ये पीएचडी सुरू केली. मला केवळ पहिली रक्कम त्या वर्षीच्या ऑगस्टमध्ये मिळाली, जी आठ महिन्यांच्या कार्यक्रमासाठी होती. त्यानंतर पैसेच मिळाले नाहीत. ही फेलोशिप महत्त्वाची आहे. कारण लाभार्थी विद्यार्थ्यांना इतर कोणतीही नोकरी करण्याची परवानगी नाही. ते पूर्णपणे फेलोशिपवर अवलंबून आहेत.”



### फेलोशिप म्हणजे काय?

» दर्जेदार उच्च शिक्षण मिळविण्यासाठी फेलोशिप देऊन ओबीसी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक सक्षमीकरण करणे हा या योजनांचा मुख्य उद्देश आहे. एमफिल किंवा पीएचडीसाठी प्रगत अभ्यास आणि संशोधन करण्यासाठी दरवर्षी एकूण एक हजार ज्युनियर रिसर्च फेलोशिप प्रदान करण्यासाठी ही योजना तयार करण्यात आली आहे. ज्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय पात्रता चाचणी नेट जेआरएफ मानव्यशास्त्र आणि सामाजिक शास्त्र, आणि यूजीसी कौन्सिल फॉर सायंटिफिक अँण्ड इंडस्ट्रियल रिसर्च नेट जेआरईसाठी पात्रता प्राप्त केली आहे, त्यांचीच निवड या कार्यक्रमांतर्गत केली जाते. या योजनेंतर्गत विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे (यूजीसी) मान्यताप्राप्त सर्व विद्यापीठे आणि संस्थांचा समावेश होतो.

### फेलोशिप वितरण नियमित आणि पारदर्शक करण्याची मागणी

» ऑल इंडिया रिसर्च स्कॉलर असोसिएशनच्या पत्रानुसार, मंत्रालयाकडून मिळणाऱ्या अनेक गोष्टींचा अभाव आहे. कारण विद्यार्थ्यांना फेलोशिपचा निधी कधी मिळणार, याबाबत स्पष्ट टाइमलाइन दिलेल्या नाहीत. यामुळे त्यांच्या त्रासात भर पडली आहे. ‘एआरआरएसए’कडून चार मागण्या करण्यात आल्या आहेत. त्यात थकबाकीसह सर्व प्रलंबित फेलोशिप देय तत्काळ सोडवा. अखंड निधी सुनिश्चित करण्यासाठी एनएफओबीसी फेलोशिपसाठी वार्षिक बजेटवाटपात वाढ, फेलोशिप वितरण वेळापत्रकाबाबत नियमित आणि पारदर्शक संवाद आणि विद्यार्थ्यांच्या समस्यांचे त्वरित निराकरण करण्यासाठी तक्रार निवारण यंत्रणेची स्थापन या मागण्यांचा समावेश आहे. दर्जेदार उच्च शिक्षण मिळविण्यासाठी फेलोशिप देऊन ओबीसी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक सक्षमीकरण करणे हा या योजनांचा मुख्य उद्देश आहे.

# विमानतळाला संत तुकाराम महाराजांचे नाव

## हिवाळी अधिवेशनात मंजूर प्रस्ताव केंद्राकडे पाठवला

**पुणे | प्रतिनिधी**

येथील लोहगाव विमानतळाचे जगद्गुरू संत श्री तुकाराम महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ पुणे असे पुर्ननामकरण करण्याचा शासकीय ठराव उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी नागपूर हिवाळी विधानसभा अधिवेशनात मांडला. त्याला तत्काळ मंजुरी देण्यात आली.

लोहगावमध्ये तुकोबारायांचे आजोळ होते. त्यामुळे लोहगाव आणि तुकाराम महाराजांचे नाते जिव्हाळ्याचे राहिले आहे. लोहगावचे गावकरी आणि तमाम वारकरी संप्रदायाचीही संवेदना या विषयाशी जोडलेली आहे. त्यामुळे लोहगावच्या विमानतळाला तुकोबारायांचे नाव देणे, हे अधिक समर्पक असणार आहे. त्यामुळे राज्य शासनाने तसा प्रस्ताव तयार करुन केंद्र सरकारकडे पाठवावा, अशी भूमिका केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी घेतली होती.



या भूमिकेवर राज्य सरकारने सकारात्मक भूमिका घेऊन पुर्ननामकरण करण्याचा शासकीय ठराव नागपूर हिवाळी विधानसभा अधिवेशनात मांडला आहे. महाराष्ट्र विधानसभा नियम ११० अनुसार पुणे लोहगाव विमानतळ येथील विमानतळाचे “जगद्गुरू संत तुकाराम महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ,’ असे पुर्ननामकरण करण्याची शिफारस केंद्र शासनाला करण्याचा ठराव यावेळी मंजूर करण्यात आला. तो केंद्र सरकारला पाठवण्यात येणार असून अंतिम निर्णय केंद्र सरकार घेणार आहे.

संत तुकाराम हे महाराष्ट्रातील मोठे संत तसेच आध्यात्मिक कवी होते. त्यांचा जन्म पुणे जिल्ह्यात झाला. लोहगाव हे संत तुकाराम यांचे आजोळ होते.

याविषयी माहिती देताना केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आपल्या एक्स अकाऊंटवर पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानले आहे.

# आता, आयटी उद्योग पुन्हा एटीत

## राज्य शासनाकडून विविध सवलती जाहीर

**पुणे | प्रतिनिधी**

खासगी जागेवर सुद्धा आयटी टाऊनशीप (माहिती तंत्रज्ञान) उभारण्यास मान्यता देण्याबरोबरच शासनाने आता आयटी क्षेत्रासाठी सवलती जाहीर केल्या आहेत. त्यानुसार आयटी धोरणानुसार मुद्रांक शुल्क माफी, विद्युत शुल्क सवलत आदी सवलती देण्यास मान्यता दिली आहे. राज्य शासनाच्या या निर्णयामुळे राज्यात आयटी उद्योग वाढण्यास चालना मिळणार आहे.

आयटी धोरणाअंतर्गत सवलती देताना शासनाने विकासकाची अर्हता, त्याचे निकषही जाहीर केले आहे. खासगी माहिती तंत्रज्ञान उद्यान स्थापन करणाऱ्या संस्थांचे घटना नोंदणीकृत मालकी, भागीदारी संस्था, खासगी मर्यादित कंपनी, सहकारी संस्था अथवा ट्रस्ट यापैकी असावी.

तसेच, ज्या इमारतीचे अथवा परिसराचे क्षेत्रफळ 20 हजार चौ.फुट पेक्षा जास्त असेल त्यांना आयटी पार्क म्हणून ग्राह्य धरण्यात येणार आहे. तसेच, मुद्रांक शुल्क माफी, विद्युत शुल्क माफी यासाठी सक्षम प्राधिकारी यांच्याकडे अर्ज केल्यास 15 दिवसांच्या कालावधीमध्ये त्यास मंजुरी देण्याचे बंधन शासनाने घातले आहे. राज्य शासनाच्या या निर्णयामुळे राज्यात आयटी उद्योग वाढण्यास चालना मिळणार आहे.



### ही आहेत नवी उद्दिष्टे

- » राज्याचे आयटी, सेवा क्षेत्रातील अग्रस्थान कायम राखणे
- » कमी विकसित भागात गुंतवणुकीस चालना देणे
- » शिक्षित तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे
- » राज्याच्या विकासाकरिता माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा वापर
- » निर्यात क्षेत्रातील उलाढाल वाढविणे

# बांधकाम प्रकल्पासाठी महापालिकेची नवी नियमावली!

## ध्वनिप्रदूषण, जलसंधारण आणि कचरा व्यवस्थापनासाठी महापालिकेचा पुढाकार

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरामध्ये झपाट्याने औद्योगिकीकरण वाढते आहे. याचबरोबर शहरामध्ये मोठ्या प्रमाणात बांधकामांची संख्या सुद्धा वाढत असून, महापालिकेने नागरिकांना चांगले जीवनमान देण्याच्या हेतूने शाश्वत आणि पर्यावरणपूरक बांधकाम पद्धती स्वीकारली आहे. त्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेने नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. गुरुवारी (दि.१९) याबाबत परिपत्रक जारी करण्यात आले.



नागरिकांच्या तक्रारींचा विचार करून आणि क्रेडाई (कॉन्फेडरेशन ऑफ रिअल इस्टेट डेव्हलपर्स असोसिएशन ऑफ इंडिया) या संस्थेसोबत उपापयोजना चर्चा करून ठरविण्यात आल्या आहेत. शाश्वत शहरी विकासाला चालना देण्यासाठी या नवीन नियमांमध्ये ध्वनिप्रदूषण, जलसंधारण आणि कचरा व्यवस्थापन यांसारख्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

**रात्रीच्या बांधकामांवर बंदी..**

शहरातील नागरिकांकडून करण्यात आलेल्या तक्रारींनंतर रात्री १० ते सकाळी ७ या वेळेमध्ये पिंपरी-चिंचवड हद्दीतील बांधकामांवर बंदी घालण्यात आली आहे. यासोबतच सर्व नवीन गृहनिर्माण प्रकल्पांसाठी वैयक्तिक पाणी मीटर बसवणे बंधनकारक करण्यात आले आहे. यामुळे पाण्याच्या वापराचा वैयक्तिक स्तरावर मागोवा घेता येणार असून, यामाध्यमातून पाण्याचा अपव्यय टाळता येणार आहे. याशिवाय, गृहनिर्माण युनिट्समध्ये बांधकाम व्यावसायिकांनी घराचा ताबा देताना एरेटर टॅप्स बसविणे अनिवार्य करण्यात आले आहे.

### बांधकाम कचरा व्यवस्थापनावर भर...

» महापालिकेने बांधकाम आणि बांधकाम पाडणीच्या कचऱ्यासाठी दररोज १५० मेट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्याचे व्यवस्थापन केले आहे. नवीन नियमांनुसार बांधकाम व्यावसायिकांना त्यांच्या प्रकल्पातून मिळणाऱ्या किमान १० टक्के पुनप्रक्रिया केलेल्या वस्तू म्हणजेच पेवर ब्लॉक सारख्या रचना नसलेल्या वस्तू वापरासाठी घेणे बंधनकारक असेल. सदर परिपत्रकाचे बांधकाम व्यवसायिकांनी पालन न केल्यास त्यांना भोगवटा प्रमाणपत्र दिले जाणार नाही. असा सुद्धा नियमावलीमध्ये उल्लेख केला आहे.

“ नागरिकांच्या समस्या सोडविण्याबरोबरच पर्यावरणपूरक विकास आणि शाश्वत शहरी विकासासाठी आम्ही ही पावले उचलत आहोत. जलसंधारण, कचरा व्यवस्थापन आणि पर्यावरणपूरक उपायांवर भर देऊन आम्ही भविष्यासाठी व शाश्वत शहर निर्माण करण्याच्या दिशेने वाटचाल करत आहोत.

**- शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

# डॉ. रघुनाथ माशेलकर ‘मोरया गोसावी महाराज जीवनगौरव’ पुरस्कार

## पंडितप्रवर गणेश्वरशास्त्री द्राविड यांच्या शुभेहस्ते ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांना पुरस्कार प्रदान

**पिंपरी | प्रतिनिधी**

महान गणेश भक्त श्री मोरया गोसावी महाराज जीवन गौरव पुरस्कार म्हणजे श्री गणेशाचा आशीर्वाद आहे. हा माझ्या आयुष्यातील सर्वात मोठा सन्मान आहे, अशा भावना ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी व्यक्त केल्या. भारताचे ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर यांना चिंचवड देवस्थान ट्रस्टच्या वतीने श्रीमन् महासाधू मोरया गोसावी यांच्या ४६३ व्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त देण्यात येणाऱ्या यंदाच्या ‘मोरया गोसावी महाराज जीवनगौरव’ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पंडितप्रवर गणेश्वरशास्त्री द्राविड यांच्या शुभहस्ते हा पुरस्कार डॉ. माशलेकर यांच्या वतीने त्यांचे सुपुत्र अमेय माशेलकर यांनी हा पुरस्कार स्वीकारला. प्रकृती अस्वास्थ्यामुळे डॉ. माशेलकर यावेळी उपस्थित राहू शकले नाहीत. पुरस्कार सोहळ्यासाठी पाठवलेल्या लेखी संदेशात डॉ. माशेलकर यांनी वरील भावना व्यक्त केल्या.



श्रीमन महासाधू श्रीमोरया गोसावी महाराज यांचा संजीवन समाधी सोहळा दरवर्षी भव्यदिव्य स्वरूपात आयोजित करण्यात येतो. या पुरस्कार प्रधान सोहळ्यास चिंचवड देवस्थान ट्रस्टचे मुख्य विश्वस्त मंदार देव महाराज,जितेंद्र देव, केशव विद्वांस, ॲड. राजेंद्र उमाप, , ॲड. देवराज डहाळे, ॲड. नरेंद्र देव, माजी महापौर अपर्णा डोके, माजी नगरसेविका अश्विनी चिंचवडे, माजी नगरसेवक ॲड. मोरेश्वर शेडगे, आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. रघुनाथ माशेलकर यांची ओळख वैज्ञानिक अशी आहेच पण ते केवळ वैज्ञानिकच नाही तर एक विचारवंत देखील आहेत. गांधींजींवर आधारित ‘टाइमलेस इंस्पिरेटर’ हे पुस्तक संपादित करणाऱ्या माशेलकरांनी सतत तरुणांना प्रेरणा देण्याचं काम केलं आहे. गेल्या पाच दशकांहून अधिक काळ त्यांनी आपलं आयुष्य विज्ञान आणि समाजाच्या सेवेसाठी समर्पित केलं आहे. 2014 साली ‘पद्मविभूषण’ हा सन्मान देऊन भारत सरकारनं त्यांच्या कार्याचा गौरव केला. त्याआधी त्यांना ‘पद्मश्री’ आणि ‘पद्मभूषण’ हे पुरस्कार मिळाले आहेत. नव्या पिढी विषयी, तरुणांविषयी आणि एकूणच भविष्याविषयी माशेलकर कमालीचे आशावादी असून ते अजूनही कार्यरत आहेत. त्यांच्या याच अलौकिक कार्याची दखल चिंचवड देवस्थान ट्रस्टच्या वतीने घेण्यात आली.

पंडितप्रवर गणेश्वरशास्त्री द्राविड म्हणाले की, देशाची शोभा ही देशातील विद्वानांमुळे आहे. त्यामुळे देशात विद्वान निर्माण व्हायला हवेत. आणि त्या विद्वानांकडून देशाची व समाजाची सेवा होणे गरजेचे आहे. त्यासाठी आजच्या काळात एक संस्कारक्षम आणि विद्वान पिढी निर्माण होण्यासाठी लहान मुलांना शालेय शिक्षणाबरोबर धार्मिक शिक्षण देण्याचीही अत्यंत महत्वाचे आहे. गेल्या दशकभरापासून भारत देशाला एक सशक्त देश बनविण्याच्या पवित्र विचारधारेने पंतप्रधान नरेंद्र मोदी देशासाठी अतिशय चांगले काम करत आहे. त्यांच्या या कार्यात योगदान देणे हे देशातील प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य आहे. आज ज्या पुरस्कार्थींचा सन्मान याठिकाणी झाला त्या सर्वांना या पुरस्काराच्या रूपाने श्रीमोरया गोसावी महाराजांचा कृपाशीर्वाद प्राप्त झाला आहे. त्यांच्या हातून यापुढेही देशाची आणि समाजाची अशीच सेवा घडत राहो अशा सदिच्छा, त्यांनी यावेळी व्यक्त केल्या.

### ‘श्री मोरया गोसावी महाराज’ पुरस्काराचे मानकरी

» चिंचवड देवस्थान ट्रस्टच्या वतीने सामाजिक कार्यासाठी सुशील पाटील, शास्त्रीय गायिका मंजुषा पाटील, वास्तु तज्ज्ञ व ज्योतिषाचार्य आनंद पिंपळकर, कायदेशीर सल्लागार ॲड. प्रियांका जोशी, वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अशोक नगरकर, आयुर्वेद तज्ज्ञ डॉ. मीनाक्षी तलोळे, हिंदू धर्मजागृती कार्याबद्दल श्री.चंद्रकांत शिंदे, शैक्षणिक आणि सामाजिक कार्यासाठी श्रीमती अंजू सोनवणे, नृत्य दिग्दर्शक योगेश देशमुख, राष्ट्रीय कराटे पंच अशोक कदम, ज्येष्ठ तबला वादक विघ्नहरी देव, बालयोगी आयुष देव, रमणबाग युवा मंच ट्रस्टचे प्रमुख सागर निपुणगे यांचा ‘ श्री मोरया गोसावी महाराज पुरस्कारा’ने गौरव करण्यात आला. तर मंगलमूर्ती पायी पालखीचे सेवक धीरज तलाठी, ओम जोगळेकर, बाळासाहेब मोकाशी, दिवाकर खोले, वेदांचे अभ्यासक जीवन जोशी, रोहित बेलसरे, गुणवंत कर्मचारी अजित मेढेकर यांचा ट्रस्टच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.

# पुणेकरांना झाले आकाश खुले..!

## पुण्यातून देशातील 35 विमानतळांसह तीन आंतरराष्ट्रीय उड्डाणांना थेट कनेक्टिव्हिटी

**पुणे | प्रतिनिधी**

लोहगाव येथील नव्या टर्मिनलवरून विमान उड्डाणांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदा विमानांची संख्यादेखील वाढली आहे. शनिवार, रविवार तर तब्बल २०० पेक्षा जास्त विमान उड्डाणे होत आहेत शिवाय पुण्यातून देशातील ३५ विमानतळांसह तीन आंतरराष्ट्रीय उड्डाणांना थेट कनेक्टिव्हिटी जोडण्यात आली आहे. त्यामुळे येथून ये-जा करणाऱ्या प्रवाशांना दिलासा मिळाला आहे. त्याचा फायदा प्रवासी आणि पुणेविमानतळ प्रशासनाला होत आहे.

पाच महिन्यांपूर्वीच नव्या टर्मिनलवरून विमान उड्डाणे सुरू करण्यात आले. सुरुवातीला जुन्या टर्मिनलवरून नव्या टर्मिनलवर दोन कंपन्यांना परवानगी देण्यात आली. त्यानंतर टप्प्याटप्प्यांने विमानांची संख्या वाढविण्यात आली तसेच दैनंदिन विमान उड्डाणांची संख्या साधारणपणे १९० पर्यंत असून, शनिवार, रविवार यांची संख्या वाढत आहे. पुण्यातून पूर्वी दैनंदिन १५० ते १६० विमानांचे उड्डाण होत होते. त्यामुळे प्रवाशांची संख्या त्यावेळी २० ते २५ हजार इतके होते. मात्र, सध्या पुणे विमानतळावरून उड्डाणे वाढल्याने दैनंदिन ३० हजारांच्या पुढे प्रवासी येथून प्रवास करत आहेत.

नव्या टर्मिनलवर अत्याधुनिक सोयी-सुविधांमुळे प्रवास आरामदायी होत आहे. त्यातच पुणे विमानतळ प्रशासनाने देशांतर्गत राज्ये, शहरांना 'उडान' या योजनेंतर्गत १२ ठिकाणी कनेक्टिव्हिटी वाढविली आहे. त्याचा फायदा पुणेकर प्रवाशांना होत असून, विमानाने प्रवास करणे सोपे झाले आहे. त्यातच उडान योजनेमुळे कमी दरात तिकिटे उपलब्ध होत असल्याने बहुतांश प्रवासी विमानाच्या माध्यमातून हवाई मार्गाने प्रवास करण्यावर भर देत आहेत. भविष्यात धावपट्टीचा विस्तार करण्यात येणार आहे. यामुळे मोठ्या विमानांची संख्या वाढविण्यात येणार आहे. धावपट्टीचा विस्तार झाल्यावर आंतरराष्ट्रीय उड्डाणदेखील वाढण्याची शक्यता आहे. त्याचा फायदा पुणेकर प्रवाशांना आणि विमान प्रशासनाला होणार आहे.



### 'उडान' योजनेचा फायदा

» पुणे विमानतळावरून 'उडान' योजनेंतर्गत नव्या सहा ठिकाणी विमानसेवा सुरू करण्यात आले आहे. याशिवाय अहमदाबाद, चेन्नई, भोपाळ या ठिकाणी उड्डाणांची संख्या वाढविली आहे. त्यामुळे प्रवाशांना हवाई प्रवास सोयीचे झाले आहे. उड्डाणामुळे पुण्यातून १ हजार १८० विमान उड्डाणे झाले आहेत. त्यातून ६९ हजार ६४६ प्रवाशांनी प्रवास केला आहे. पुण्यातून सिंधुदुर्ग, नांदेड, जळगाव, किशनघर, भावनगर, प्रयागराज या शहरांसाठी ही विमाने सुरू आहेत.

# झेडपीची कंत्राटी शिक्षक भरती थांबली

## 'टीईटी'चा निकाल फेब्रुवारीत तर 'टेट' जूनमध्ये : पटसंख्या कमी असलेल्या शाळांबाबत सरकारच्या निर्णयाची प्रतीक्षा

**पुणे | प्रतिनिधी**


गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील भरती प्रक्रिया पुन्हा थांबली आहे. यामुळे पटसंख्या कमी असलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये कंत्राटी शिक्षकांच्या भरतीचा निर्णय लांबणावर गेला आहे.

राज्यसरकारकडून जिल्हा परिषदेच्या ज्या शाळांमध्ये १ ते २० विद्यार्थीसंख्या (पट) आहे. अशा सर्व शाळांवर सेवानिवृत्त शिक्षक नेमण्याचा शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला. त्यानंतर त्या निर्णयात अचानक बदल करून दहापर्यंत पटसंख्या असलेल्या शाळांवर कंत्राटी शिक्षक डीएड, बीएडधारक सुशिक्षित तरुण-तरुणींना नेमण्याचा निर्णय झाला. आता पुन्हा तो निर्णय थांबविण्यात आला असून कमी पटसंख्येच्या झेडपी शाळांवरील शिक्षकांचा प्रश्न 'जैसे थे' आहे. शालेय शिक्षण विभागाला यासंदर्भात आता नवीन शिक्षणमंत्र्यांच्या आदेशाची प्रतीक्षा आहे.

राज्यातील १४ हजार ७८३ शाळांमधील पटसंख्या १ ते २० पर्यंत असून त्यात पुणे जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ३,६२९ पैकी एक हजारापेक्षा जास्त शाळा आहेत. त्यात ३०० हून जास्त शाळांचा पट दहापेक्षा कमी आहे. या शाळांवर कंत्राटी शिक्षक घेण्याचा निर्णय झाला होता. पण, त्याची कार्यवाही थांबल्याने शासनाच्या धरसोड भूमिकेवर डीएड-बीएडधारक तरुण-तरुणी वैतागले आहेत.

राज्यात ३० ते ३२ हजार शिक्षकांची भरती केली जाईल, अशी ग्वाही तत्कालीन शिक्षणमंत्र्यांनी दिली होती. मात्र, अजूनही जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये सात हजारांवर शिक्षक कमीच आहेत. अजूनही समानीकरणाअंतर्गत हजारो शाळांमध्ये पटसंख्येच्या तुलनेत शिक्षक भरलेले नाहीत.

'टीईटी' पार पडल्यानंतर या परीक्षेचा निकाल फेब्रुवारीअखेर अपेक्षित आहे. उत्तीर्ण झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्याचे पेपर बारकाईने तपासले जात आहेत. प्रत्येक उत्तराला अचूक गुण दिल्याची खात्री अधिकाऱ्यांकडून केली जात आहे. त्यामुळे निकालास आणखी दीड ते दोन महिने लागू शकतात. त्यानंतर 'टीईटी'त उत्तीर्ण विद्यार्थ्यांची जून-जुलैमध्ये 'टेट' घेण्याचे नियोजन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने केले आहे.



### नववर्षात 10 हजार पदे भरण्याची शक्यता

» आता पवित्र पोर्टलच्या माध्यमातून नवीन वर्षात शिक्षक भरती होणार असून ज्या जिल्हा परिषदांमधील शिक्षकांच्या रिक्तपदांचे रोस्टर (बिंदूनामावली) अचूक आहे, कोणाचीही हरकत नाही तेथील ८० टक्के पदभरती होणार आहे. दुसरीकडे खासगी अनुदानित माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती देखील झालेली नाही. नवीन वर्षात शालेय शिक्षण विभागाकडून शिक्षक भरतीची खुशखबर येवू शकते. जवळपास १० हजार शिक्षकांची भरती होवू शकते, असे शालेय शिक्षण विभागातील वरिष्ठ सूत्रांनी सांगितले.